**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १६/०३/२०२५ (रविवार) संध्याकाळ**

---

## अंमली पदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दि.१५/०३/२०२५ रोजी पोलीस ठाणे खापरखेडा परीसरात स्थानिक गुन्हे शाखा चे पथक पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली कि, वलणी येथे राहणारा इसम नितेश अशोक सिंग हा वलनी खदान येथील झाडीझुडपामधे बसून अंमली पदार्थ गांजा विक्री करतो. मिळालेल्या महीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वलनी खदान परिसरात गेले असता तेथे झाडी झुडपामध्ये एक इसम बसून दिसला पंचा समक्ष त्याला त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **नितेश अशोक सिंग वय ३३ वर्ष रा वार्ड क्रमांक ६ वलनी कॉलनी** असे सांगितले पंचा समक्ष त्याची अंग झडती घेतली असता त्याच्या ताब्यातील पांढऱ्या रंगाचे थैलीमध्ये गुंगीकारक वनस्पती ओलसर गांजा आढळून आल्याने नमुद आरोपीचे ताब्यातुन (१)` गुंगीकारक वनस्पती ओलसर गांजा ज्याचे निव्वळ वजन ३५८ ग्राम किमती ३५८०/—रुपये (२) पांढऱ्या रंगाची थैली किमती ५/— रुपये असा एकूण ३५८५/— रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी नामे नितेश अशोक सिंग वय ३३ वर्ष रा वार्ड क्रमांक ६ वलनी कॉलनी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे एन डी पी एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास खापरखेडा पोलीस करत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर